35542

①

S.Y. B.A. Sanskrut

Paper II

प्रश्न 1. A i) त्यानंतर समुद्रातून सूर्याप्रमाणे देदीप्यमान, शीतरश्मि उज्ज्वल चंद्र उत्पन्न झाला. त्यानंतर समुद्रातून पीत वस्त्र सुशोभित लक्ष्मी उत्पन्न झाली. नंतर सुरादेवी तसेच पांढऱ्या रंगाचा घोडा उत्पन्न झाला.

ii) त्याने जर्जर झालेले सुरकुत्या पडलेले लोक पाहिले त्यानंतर घोडे पुढे जाऊन राजमार्गाची शोभा बघत जाऊ लागला.

B) i) संगीत समारोहांच्या कार्यक्रम ~~..~~ अनुभवण्यासाठी खूपच वेगळा आणि परिणामकारक असतो. संगीतसभा, व्याख्यानसभा धार्मिक उत्सव उद्घाटनासाठी किंवा उद्घाटक म्हणून मला निमंत्रणं प्राप्त होतात. जर मी त्यांचे निमंत्रण स्वीकारले नाही तर कार्यकर्ते दुःखी होतात. म्हणूनच मला त्याचा स्वीकार करावा लागतो. पण मग मी अट घालतो की मी मंचावर भाषण करणार नाही.

ii) मी त्या कालकूट नावाच्या महाभयंकर अशा विषाला पिऊन शकतो. याशिवाय तुम्हास इतर कुठले अशक्य कार्य असेल तेही मी करेन, कार्य कष्टसाध्य असेल तेही करेन तुम्ही ~~चिंत~~ निश्चिन्त व्हावे.

C) i) रूपाची हानी होते. व्यसनांमुळे शक्तिनाश होतो शोक होतो आणि रतीभावना, कामभावना यांचा आश्रय होतांना जाणे. स्मृतीचा नाश होतो आणि आपले इंद्रियच आपले शत्रु बनतात आणि शेवटी वार्धक्यच येणार असते यालाच 'जरा' असे म्हणतात. आणि जरा म्हणजे भग्न होणारे.

ii) प्रथम महिला स्वतःचे बोलण्याचे स्पष्टीकरण देत म्हणाली आज एखादा मुलगा जेव्हा बी.ई. होतो तेव्हा तो साधारण बावीस वर्षांचा असतो. त्याला लगेच एखाद्या सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी लागते साधारण नोकरीत दोन वर्ष झाली की त्याला परदेशी जाण्याची संधी येते. एव्हाना तो पंचविशीचा झालेला असतो त्याचे वडील जर समजा बँकेत अधिकारी किंवा प्रामाणिक सरकारी नोकर

आहीतर प्राध्यापक असते तर त्यांनी आयुष्यभर कष्ट करून जेवढा पैसा कमावलेला नसेल तेवढा या मुलानं आजवर मिळवलेला असतो. ~~मला आता~~

(२) नालन्दा विद्यापीठ — एक प्राचीन नगर आणि विद्यापीठ बिहारमध्ये पाटण्यापासून ६० मैल अंतरावर गंगा नदी काठी आहे. बडगाव नामक खेड्याच्या परिसरात हे नगर होते. तिथे या नगराचे बरेच अवशेष सापडले.

ह्युवान त्संग आणि इत्सिंग यांनी केलेल्या वर्णनानुसार नालंदा विद्यापीठात १०००० भिक्षू राहत होते. या सर्वांना निवास, जेवणखाण, कपडालत्ता, औषधोपचार व शिक्षण निःशुल्क देण्याची सोय होती. आणि आश्रयासाठी १००० मोठ्या खोल्या होत्या. खोल्यांमध्ये झोपण्यास ओटे होते. दिवा ठेवण्यास कोनाडे असे. खोल्यांचे हरवर्षी नव्याने वितरण होत असे. १५०० च्या वर अध्यापक अध्यापनाचे काम करत होते. अध्यापकांची किर्ती सर्वदूर पसरलेली होती. यापैकी १००० अध्यापक विविध विषयांत पारंगत होते. ५०० आचार्य ३० विषयांचे अधिकारी होते. दहा जणांचे १० विषयांवर प्रभुत्व असणारे होते तर कुलपती शीलभद्र हा सर्वज्ञ होता. उच्च शिक्षणाची सोय होती. प्रवेश परीक्षा कठीण होती. विद्यापीठाचे स्वरूप शिक्षक विद्यार्थ्यांचा संघ असे होते. हे विद्यापीठ स्वयंशासक असून त्यांनी स्नातकांना अध्यापक प्रमाणपत्रे देत. धर्मशास्त्र तत्त्वज्ञान आयुर्वेद वाङ्मय विधी इ विद्याशाखांचे अध्यापन चालत असे.

तक्षशिला विद्यापीठ — एक प्राचीन नगरी व विद्यापीठ भारताच्या वायव्येकडील गांधार देशाची राजधानी होती. ऋग्वेदात गांधार देशाचा उल्लेख मिळतो. परंतु तक्षशिलेचा मिळत नाही. गांधार देशातील शत्रूंचा नाश करण्यासाठी रामचंद्राच्या आज्ञेने भरत तिकडे गेला याचा उल्लेख रामायणात आढळतो.

3

गुप्तकालीन समाजव्यवस्था – गुप्त साम्राज्य भारताच्या उत्तरेकडील मोठ्या भूभागावर इसवीसनाच्या ३ऱ्या ते ५ व्या शतकापर्यंत होते. गुप्त राज्याची स्थापना श्रीगुप्त याने केली. पहिल्या चंद्रगुप्ताच्या काळात गुप्त राज्याचे साम्राज्य झाले. तो भारतीय इतिहासाचा सुवर्णकाळ होता. या काळात भारताने फार मोठी मजल मारली होती. या गुप्त साम्राज्याचा काळ इसवीसन २४० ते इसवीसन ५५० असा मानला जातो. गुप्त साम्राज्य सैन्यबळावर टिकले. गुप्त साम्राज्यात नगररचना ही अनेक विभागात विभागली होती. त्यांची सुव्यवस्था व राज्यकारभार पाहणे सोपे जात असे. या प्रांतांना भुक्ती असे म्हणत. त्यावर अधिकारी नेमले जाई. अधिकाऱ्यांना वेतन दिले जात असे काही अधिकाऱ्यांना जमीनी बक्षीस दिल्या जात असे राजकीय व आर्थिक स्थिरता होती. शिल्पकला, चित्रकला वास्तु कला या कलांना मोठा वाव होता. कास्य वितळून मूर्ती करण्याची कला अवगत होती गुप्तकाळात भास हा नाटककार होता. गणितज्ञ आर्यभट्टांचा जन्म याच काळात झाला. बरेचसे लोक वैष्णव पंथाचे होते. ब्राह्मणांना उच्च दर्जा होता. शेती, कुंभारकाम, खाणकाम तसेच अनेक इतर काम करून लोक पैसे मिळवत असे. सुवर्णमुद्रा व दिनार वापरले जायचे

वृक्षायुर्वेद – वृक्षायुर्वेद संस्कृत ग्रंथ. ज्यात वृक्षांच्या स्वास्थ्यपूर्ण विकास आणि पर्यावरणाशी संबंधी सुरक्षे विषयी विचार मांडले आहे. सुरपालाची रचना आहे. सन १९९६ मध्ये वाय. एल नेणे यांनी ऑक्सफर्डच्या बोडलियन ग्रंथालयात पांडुलिपि प्राप्त केली.

वृक्षायुर्वेदाची पांडुलिपि देवनागरीच्या प्राचीन रूपात आहे. ६० पानसंख्या ३२५ श्लोक आहेत यामध्ये १७० वृक्षांची विशेषता आहे. यात बीजांची खरेदी, त्याचे संरक्षण त्यांचे संस्कार, रोप लावण्यासाठी जागा खोदणे, जमिनीची निवड, आन्तरिक तसेच बाह्य रोगांपासून वृक्षांची सुरक्षा चिकित्सा, बगीची काळजी इत्यादींचे वर्णन आहे



(5)

प्र ३ ससंदर्भ लिखत।

i) अपरा एका शिरोवेदना।

संदर्भ: — सुधामूर्ति लिखित वाईज अदरवाईज या पुस्तकातील 'परिवर्तनशील जगणं' या कथेतील वाक्य. आधुनिक उत्सवांचे बदलते स्वरूप व नोकरी विषयक विचार यावर मार्मिक चिंतन केले आहे.

अर्थ: ही आणखी एक डोकेदुखी.

स्पष्टी: — काही नातेवाईक भेटवस्तू घेऊन येतात मग आपल्याकडून त्यांच्यासाठी काहीतरी आणावं लागतं. हा एक वैताग आहे. गेल्यावर्षी मिळालेल्या भेटवस्तू अजूनदेखील उघडलेल्या नाहीत. कदाचित यावर्षी कुणालातरी द्यायला उपयोगी पडतील. सुकामेवा, मिठाई, चे डबे, कँडल स्टँडस, कटलरी येतो. सगळे शरीराचे आरोग्य जपणारेच असतात.

ii) भूसंतुलाक्ष शिथिलातांडे ---- प्रकुर्यदिच्छां।

संदर्भ अश्वघोष विरचित बुद्धचरित एक महाकाव्य आहे यात गौतम बुद्धांच्या पवित्र आणि सात्विक जीवनाचे सुंदर आणि अलंकारिक वर्णन केले आहे. या काव्यामुळे अश्वघोषाची कीर्ती सर्वदूर पसरलेली आहे. या काव्याचे दोन भाग असून १४ सर्गांचे आहे आणि उत्तरार्धात गौतम बुद्धांनी बोधी प्राप्ती ते निर्वाणापर्यंतचा वृत्तांत आहे.

अर्थ त्यानंतर राजाने आपल्या पुत्राच्या इच्छेचे भाव ऐकल्यावर आपल्या पुत्राचे मित्र स्नेही इत्यादींसह ऐश्वर्यात त्याच्या विहार यात्रेची (फिरण्याची) आज्ञा दिली.

(B) i) ब्रह्माविष्णू पुरस्कृत्य ---- शङ्कराभिकम्।

संदर्भ — मत्स्यपुराण २५० अध्याय समुद्रमंथनाची कथा.

अर्थ — ब्रह्म आणि विष्णूला पुढे करून महादेवांकडे जायला निघाले. कथासारासहित स्पष्ट करा.

ii) अंतिमं वाक्यं ---- विस्मय जनितम्।

संदर्भ — वरील प्रमाणे,

अर्थ — शेवटचे वाक्य ऐकून मला चांगलाच धक्का बसला.

स्पष्टीकरण — सॉफ्टवेअरचा भार काही बाबतीत फार वाईट आहे

~~नि महत्त्वा~~ त्यामुळे इतरांचं नुकसान होतं आजकालच्या मुलींना इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स, मेकॅनिकल इंजिनीअर्स किंवा डॉक्टरसुद्धा नको असतात, कारण या मुलांना परदेशी जाण्याची संधी फारशी मिळत नाही शिवाय त्यांचे पगारही तसे बेताचेच असतात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांना घरात काहीच मान नसतो.
याचे लेखिकेला फार आश्चर्य वाटते.

(d) नगररचना शास्त्र :— (मानसोल्लास)
सोमेश्वराच्या काळात ग्रामांशिवाय इतर अनेक नगरही होते. यात एक राजधानीचे नगर असायचे त्याला सोमेश्वराने महापत्तन असा शब्दप्रयोग केला आहे. हे नगर अत्यंत रमणीय तसेच विशाल असायचे. राजधानीच्या नगराशिवाय इतर अनेक पुर (नगर) असायचे. पण यांची संख्या अतिशय कमी असायची. सोमेश्वराने महापत्तन व पुर असा उल्लेख केला असला तरी त्याचे विस्तृत वर्णन केले नाही. त्याने एवढेच म्हटले आहे की त्या पुराजवळ ~~विहिर~~ विहार करायला वन, उद्यान हवे. या पुरात भरपूर लोक राहतात. ते पुर झाडे, वेली फुलांनी युक्त असो. राष्ट्र प्रकृतीचे सात भेद सांगितले आहे धान्वदुर्ग, महीदुर्ग, जलदुर्ग, नृदुर्ग आणि गिरिदुर्ग, वार्क्षदुर्ग असे दुर्ग ~~मात~~ मिळून एक पुर बनते.

प्र. ५. रिक्तस्थानानि पूरयत ।

i) कण्ठकाश्रु (ii) पुत्राभिधानस्य (iii) मन्थानम्
iv) ~~सुराभि:~~ मेघस्वनः (v) सुराभिः ।

(b) संस्कृतेन उत्तरत —
1) छन्दकः गौतमबुद्धाय पद्मखण्ड नामक वने नयति ।
2) महिलाद्वयम् विवाहसंस्थायाः सञ्चालिके स्तः ।
3) बुद्धचरितस्य रचयिता 'अश्वघोषः' ।
4) शङ्करस्य नामानि — विरूपाक्षः, पिनाकहस्त, वज्रहस्त, धन्विनः, त्रिशूलहस्त ~~स्त~~ 'रुद्रः', त्रैलोक्यनाथ इत्यादय ।

(c) युग्मानि योजयत ।
i) पौराः — प्रजा; वयस्य — मित्रम्; तुरगाः — अश्वाः, गजेन्द्रः — ऐरावतः; निशा — शर्वरी

(7)

5) टिप्पणीं लिखत ।

A i) राजमार्गवर्णनम् - संदर्भ पूर्वीप्रमाणे
सुकोमल अन्तःकरण असलेल्या कुमाराच्या चित्तामध्ये संवेग (वैराग्य) उत्पन्न होऊ नये असा विचार करून दीनदलित सामान्य जनतेला राजमार्गावर जाण्याची बंदी घातली. सर्व अवयवहीन गलितगात्र म्हाताऱ्या लाचार लोकांना गरिबांना असं न शोभणारे बाजूला सारून त्यांनी राजमार्ग उत्कृष्टपणे सुशोभित केला.

ii) राजप्रासादवर्णन - संदर्भ पूर्वीप्रमाणे वर्णन

(C)

iii) विरूपाक्ष - समुद्रमंथनकथा संदर्भ लिहा. शंकराचे नाव. विषप्राशनाचा प्रसंग.

iv) शुक्राचार्य - ऋषी भृगुंचे पुत्र व असुरांचे गुरु. वैवस्वत मन्वंतरातील पुरंदर इंद्राची कन्या शुक्राचार्यांचा विवाह झाला होता. शंकराच्या कृपेमुळे संजीवनी विद्याप्राप्त या विद्येच्या आधारे वारंवार देवगणांचा पराभव होत असे. समुद्रमंथन कथेतील शुक्राचार्यांची भूमिका लिहा.

(B) अन्यगृहिण्यः । भिन्न दृष्टिकोन - परिवर्तीनी जीवनशैली महिला चर्चा.

सङ्गणकअभियंता मतम् — परिवर्तीनी जीवनशैली

Q. पताकास्थानकम् :—

कथानकाचा प्रवाह जरी योग्य तऱ्हेनें चालला असला तरी त्यास अनपेक्षित कलाटणी देणे, कलात्मकतेने पुढील घटना सूचित करणे, यांची काही योजना नाटककारास करावी लागते. अशा योजनांस 'पताकास्थान' म्हणतात. यांच्या 'पताका' म्हणजे उपकथानक या शब्दाशी काही संबंध नाही. सैन्याचे आगमन ज्याप्रमाणें पताकांनी सुचविलें जाते, त्याचप्रमाणे पुढील घटना सुचविणाऱ्या या पताका म्हणजे ध्वजच होत. यांचे चार प्रकार आहेत व ते भरताने दिले आहेत व तेच विश्वनाथाने आपल्या साहित्यदर्पणात दिले आहेत. पहिला प्रकार म्हणजे एखाद्या इष्ट वस्तूची प्राप्ती अनपेक्षितपणाने होणार व ती कायमची मिळणार अशी सूचना देणारा पताकाचा पहिला प्रकार आहे. उदा. रत्नावली अंक ३ मधील प्रसंग. सागरिका वासवदत्तेच्या वेशांत गळ्याला फांस लावून घेत आहे असे राजाच्या दृष्टीस पडते. राजाला वाटते, ही खरोखर वासवदत्ता आहे व आपण केलेल्या तिच्या विश्वासघातामुळे ही जीव देण्यास तयार झाली असावी. म्हणून तो तिला आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी तिच्या गळ्याभोवती-चा पाश काढतो, तो त्याला आढळून येते की, ही वासवदत्ता नसून आपल्यास इष्ट असलेली सागरिकाच आहे!

दुसऱ्या प्रकारांत शब्दावर श्लेष असून दुसऱ्या अर्थावरुन भावी गोष्ट सुचवलेली असते. शब्दांचा एक अर्थ काही पात्रे घेतात, तर दुसरा दुसरी पात्रें घेतात. त्यामुळे त्यामध्ये प्रेक्षकांच्या चित्ताला चमत्कार वाटतो. उदा. वेणीसंहाराच्या पहिल्या अंकात (श्लोक ७) यामध्ये सूत्रधार पुढील श्लिष्ट शब्दयोजना करतो.

रक्तप्रसाधितभुवः क्षतविग्रहाश्च स्वस्था भवन्तु कुरुराजसुताः सभृत्याः॥

या सूत्रधाराच्या शब्दयोजनेवरुन भीमाचा ग्रह असा होतो की, कौरवांनी पांडवांच्या हक्कांची भूमि त्यांना परत करुन पांडवांशी प्रेम जोडले आहे आणि त्यामुळे ते आपल्या सेवकांसह स्वस्थ होतील. परंतु ही घटना भीमाला अभिप्रेत नसल्यामुळे तो ~~संतापतो~~ संतापतो व सहदेव त्याची त्याच शब्दांचा दुसरा अर्थ सांगून समजूत घालतो. सहदेव म्हणतो,

वाक्याच्या शेवटी 'पर्याप्तमेव करभोरु। ममोरु-युग्मं' असे म्हणतो. इतक्यात, कंचुकी धावऱ्या - धावत्या येऊन म्हणतो, "देव, भग्नं, भग्नम्" म्हणजे 'महाराज, मोडली. मोडली' दुर्योधन आपल्या।

(10)

"दादा, तसे नव्हे. सूत्रधार असे म्हणतो की, ~~कौरव~~ कौरव आपल्या रक्ताने रणभूमि रंगवतील. त्यांची शरीरे नाश पावतील आणि ते कौरव आपल्या सेवकांसह स्वर्गवासी होतील." येथील पताकास्थानाने कौरवांच्या भावी नाश जाता जाता सहज सुचविला आहे.

पताका स्थानाच्या तिसऱ्या प्रकारांत प्रस्तुत गोष्टीवरूनच भावी घटनेची सूचना केलेली असते. दुसरा प्रकार व तिसरा प्रकार यांत फरक असा की, पहिल्यांत क्लिष्ट असा शब्दश्लेष असतो तर दुसऱ्यात 'व्यंजना' असते. याचे उदाहरण 'रत्नावली' अंक २.४ हे स्थळ देतात. बागेतील एका लतेला फुले आली आहेत, आणि ती आलेली पाहिल्या-बरोबर मत्सरामुळे राणीला राग येईल व तिचे मुख रागाने तांबडेलाल होईल असे उदयन जाता जाता सहजच म्हणतो. पण दुसऱ्या एका कारणावरून वासव-दत्तेला पुढे लवकरच राग येणार आहे ही भावी घटना येथे उत्तम तऱ्हेने सूचित झाली आहे. ज्याला नाटकात भावी अर्थसूचक शब्दयोजना (Prophetic words) म्हणतात त्यांतला हा प्रकार आहे. मृच्छकटिक नाटकांत मैत्रेय दागिने संभाळून कंटाळलेला असतो व तो म्हणतो, "काय हो, उज्जयिनींत एकही चोर नाही काय कीं जो हे दागिने चोरून नेऊन माझ्या मनाला शांति देईल." या मैत्रेयाच्या सहज काढलेल्या उद्गारांवरून शर्विलकाने केलेल्या दागिन्यांच्या चोरीची पूर्वसूचना येथे दिली गेली आहे.

चौथ्या प्रकारांत एखादे पात्र सहजच एखादा शब्द उच्चारते. परंतु दुसऱ्याला मात्र, त्याच्या मनांत निराळेच विचार चालत असल्यामुळे, त्याचा निराळाच अनपेक्षित अर्थ वाटतो. उदा. वेणीसंहार अंक २ मध्ये भानुमती - दुर्योधन बोलत बसले आहेत आणि दुर्योधन आपल्या मनांत माझी मांडी मोडली असा अर्थ घेतो व कंचुकीला तो विचारतो, 'अरे कोणी?' तेव्हा तो म्हणतो 'भीमाने!' (भीमेन) दुर्योधन विचारतो, 'असे कुणाची मांडी?' तेव्हा कंचुकीही इतक्यांत सहजपणे म्हणतो

पतितं किंकिणीक्वाणबद्धाक्रंदमिव क्षितौ।" म्हणजे "मोडिली भीम-वाऱ्याने आपली की रथध्वजा। घंटानादमिषे भूमी गाठली क्रंदुनी जणूं।।" असे म्हणतो. पण दुर्योधनाच्या मनात भलताच अर्थ येतो व तो रागावतो. पण रंगभूमीवर हा प्रकार चालला असता प्रेक्षकांस

धारिणी, वासवदत्ता. वगैरे प्रगल्भा नायिका होत.
विशेषत: शृंगार - नायिकांमध्ये आठ प्रकार कल्पिलेले आहेत. त्या म्हणजे स्वाधीनभर्तृका, खंडिता, अभिसारिका, कलहान्तरिता, विप्रलब्धा, प्रोषितभर्तृका, वासकसज्जा व विरहोत्कण्ठिता. या आठ निरनिराळ्या नायिका आहेत असे नाही. एकच नायिका परिस्थितीप्रमाणे इतर नायिकांची रूपे घेऊ शकेल. मृच्छकटिकांतील वसन्तसेना व विक्रमर्वशीयांतील उर्वशी या आपल्या प्रियाकडे येतांना अभिसारिका बनल्या आहेत.

→ काव्यप्रकाशाची रचना व काळ -
- मम्मटाचा काव्यप्रकाशावरील ग्रंथ.
काव्यप्रकाश म्हणजे शब्दार्थांच्या माध्यमातून तयार होणारे शास्त्र होय.

- काव्यप्रकाशाचा उल्लेख ख्रिस्तपूर्व ८००. ~~तयार~~ व निरूक्त या ग्रन्थात आढळतो. ~~ख्रिस्तपूर्व - मम्मट~~ .. पाणिनीच्या ख्रिस्तपूर्व ६०० यांच्या व्याकरण ग्रन्थात अलंकाराचा उल्लेख ~~आढ~~ आढळतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात काव्यशास्त्रीय भाषेचा उल्लेख दिसतो. ५ शतकातील अशा प्राचीन भारतीय शिलालेखांचा अभ्यास करून ब्युलरने असा निष्कर्ष काढला की या लेखांच्या कर्त्यांनी, रचयितांना काव्यशास्त्राच्या नियमांची माहिती असावी. त्यावरून भामः, दण्डी, बौद्ध कवी अश्वघोष त्याचे बुद्धचरित काव्य इत्यादि ग्रंथामध्ये अलंकाराचा प्रयोग केलेला दिसून येतो.

काव्यशास्त्र हे फार प्राची काळी अस्तित्वात होते. भरताचा काळ ख्रिस्तपूर्व २०० किंवा ~~२~~ ख्रिस्त २०० असे मानला तर त्यांनी लिहिलेल्या नाट्यशास्त्रात नाट्य आणि त्याच्या संबंधीत नृत्य, संगीत, गीत, अभिनय, रस

इत्यादिंचे वर्णन करतांना काव्यशास्त्रीय विषय हाताळूनच केलेले आहेत.

काव्यप्रकाशाचा स्वतंत्र संसार आहे. भामह (ख्रिस्त ६००) लिहिलेला काव्य अलंकार, दण्डीने (ख्रिस्त ६००-७००) लिहिलेले काव्यदर्श. उद्भटटाने काव्य लङ्कार सार सग्रह वामनाचे (ख्रिस्त ८००) काव्यलङ्कार सूत्रवृत्ती, रुद्रट (ख्रिस्त ८०० ते ८५०) काव्यलङ्कार आनंदवर्धमान (ख्रिस्त ८४०-८७०) व त्यालेक आणि कुंतकाने लिहिलेले वक्रोक्ती (ख्रिस्त ९२५-१०२५) या ग्रंथामध्ये काव्याची माहिती आहे. म्हणजेच काव्यप्रकाश हा अतिशय जुना असून त्याचे ५ संप्रदाय मानले गेले आहेत. रस, अलंकार, रिती, ध्वनी आणि वक्रोक्ती ह्या आधारानेच काव्यप्रकाशाची रचना केली असावी.

~~काव्यप्र~~ काव्यशास्त्राची रचना सर्व स्पर्शी असून मांडणी सुसंगत आहे व ह्यात कुठलीही उणीव दिसत नाही. अलंकाराचे एक क्षेत्र काव्यप्रकाशात दिसून येते. काव्यप्रकाशातील सूत्रे छंदोबद्ध आहेत. पाचव्या उल्लासातील ध्वनी मिमांसा, नव्यातील श्लेष मिंमासा, दहाव्यातील अलंकार मिमांसा. ह्या सोडल्यास काव्यप्रकाशातल्या वृत्ती साधारण पणे सूत्र पद्धतीनेच आहे. वृत्तीतल्या शब्दयोजनेत कमीत कमी शब्द सांगून मोठा अर्थ समजतो.

काव्यप्रकाशाचे एक विशेष म्हणजे त्यात असणारे भरपूर प्राकृत उदाहरणे, काव्यप्रकाशातील वाक्य लहान सुटसुटीत आहेत. कधी कधी मधूनच गुंतागुंतीचे वाक्य ही आढळून येतात. प्रत्येक वृत्ती उदाहरणासहित स्पष्ट केल्या आहेत.